Impact Factor - 6.261 ISSN - 2348-2145
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION
RESEARCH JOURNEY
INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL
PEER REFREED & INDEXED JOURNAL
January - 2019
SPECIAL ISSUE- 97

समीक्षा आणि संशोधन

अतिथी संपादक :
डॉ. भास्कर शेळके
प्राध्यापक,
आसिरि कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले
ता. अकोले, जि. अहमदनगर

विशेषांक संपादक :
डॉ. रंजना पाटेकर
मराठी विभाग प्रमुख,
आसिरि कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले
ता. अकोले, जि. अहमदनगर

विशेषांक सहसंपादक :
डॉ. सुनील धनवटे
डॉ. विजय काळे
प्रा. गोपाल गडाख

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

"RESEARCH JOURNEY" International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.641 (2018) | 7.434 (2019)
Special Issue 92 : राष्ट्रीय चर्चा सत्र मालिका
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

आदिवासी स्त्रीयांचे फाल्गुनोत्सव

डॉ. अनेश्वर पाल्लेवाड,
पांडुरंग सा. आदेवाड, जि.पुणे.

प्रास्ताविक :

आदिवासी साहित्यविश्वातील काव्यप्रवाहात उषाकिरण आत्राम 'मोहफुलांच' (१९९७), 'लेखनीच्या तलवारी' (२००९), 'एक होता आनंदवा' (बालकाव्यसंग्रह), कु. कुसुम आत्राम 'या वाघली प्रसिद्धी मिळालेली आहे.

उषाकिरण दादाजी आत्राम या आदिवासी साहित्यक्षेत्रातील आपाद्योच्या पहिल्या पिढीतील श्रेष्ठ कवयित्री म्हणून प्रसिद्ध आहेत. त्याच्या 'मोरकी' मधील 'जगापासून दूर-दूर' या कवितेतून जगाच्या पाठीवर अस्पृश्य मानलेल्या आदिमानव समूह म्हणजे आदिवासी होय. जगलविच्छेदाय ज्ञान-विज्ञानाचा स्पर्श अजून झाला नाही. अपरिहार्यपणे मरण येत नाही म्हणून तो जगतो आहे. आपल्या देहाची, जीवनाचा बलिदानाची करण्याचे स्वप्नसुद्धा शिकविले नाही. जगण्याच कोणतही प्रयोजन नसताना दुःखमुक्तीसाठी रोजगारच्या सांस्कृतिक मार्गाचा आधार घेतला जातो, तो असा की,

"दुःखाला विसरण्यासाठी
बांबूच्या सनईतून
चामडीच्या ढोलातून घडक ढम.....तालावर
रि.....रे.....रे रा रे रि रोरे रा रे!" (पृ.१५५)

'पयसाची लाल आग व्हय!' या कवितेतून आदिवासी स्त्रीला मानाचे स्थान नाही, हे प्रतीत होते. पुरुषाच्या सौंदर्य उपभोगाचं एक साधन, डोंगरातील तिचे काबाडकष्ट, पुरुषाची तिरकस नजर यामुळे ती जगलातच कैद झाली आहे. आदिम स्त्रीत्वाचा स्वाभिमान तुडवला जातो आहे. म्हणूनच आदिवासी स्त्रीने पयसाप्रहारणातेचा त्याग करून नव रूप धारण करावे, कारण कवय तर

"वाटेनं-जातेस तर समदा डोयाले आग लागन
राणे! तुझ्याबर नजर समदा सुधारलेल्या दाढ्यावची"

म्हणून कवयित्री म्हणते,

'तू रातराणी होवू नग!'
'व्हशील तं पयसाची लाल लाकडी आग व्हय!'
नायतू - बिब्याची फुलं व्हय!'

अशी विद्रोहाची लाल आग धारण करणाऱ्या स्त्रिया गुड्या-गुड्यावर (पाड्या-पाड्यावर) आहेत. सर्व कवयित्रीला त्याचा शिणगार (शृंगार) वाटतो आहे.

'अत्त दिप भव' या कवितेत आपणच आपल्या प्रकाशाचे दीप व्हावे, आपणच आपले शिल्पकार व्हावे, [illegible] विश्वास, आशीर्वाद, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे हे विश्वासघाताचे लक्षण [illegible] आदिमाना साद्य करते की,

"RESEARCH JOURNEY" International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 97 : मराठीचा व्यापक संदर्भात
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

त्याच ओंजळी एकलव्याच्या अंगठ्याचे रक्त सिंचत
कुणाच्या मंत्रतंत्र तपदेशमणीवर भाळू नका
आपणच आपले जगणे–मरणे ठरवा!
आपणच आपला अंत दिप व्हा ।।" (पृ.१५७)

परकर्तृत्वित अस्तित्व कर्तृत्वी नाकारते आहे. वरील काव्यपंक्तीमधून बुद्ध तत्त्वज्ञानाचे दर्शन कवयित्री घडवितेत.

'परिवर्तन' या कवितेतूनही हाच सूर प्रकट होतो. ही कविता परिवर्तनाचा ध्यासमूल्य मांडणारी आहे. परप्रकाशरणता टाळून स्वयंपूर्णतेची आस कवयित्रीला आहे. इतिहासातील क्रांतिकारकांच्या माध्यमातून कवयित्री आपली बुद्धिस्थाने शोधत आहे. त्यातून प्रेरणा मिळते. काल, परवापर्यंत गोंडी स्त्रीच्या राहणीमानाला फुलवती सदाशिव पेठ नावे ठेवत असत. हसत असत. परंतु परिवर्तनाभिमुख गोंडी स्त्रीला राणी दुर्गावती, तिलका, राणी हिराई, शूरप्रतापी रावण, एकलव्य, बिरसा मुंडा, सग्रामशहा, भिमकुमरा, बाबूराव शेडमाके, लटया भिलट, नारायणसिंह इंकि या सर्व क्रांतिकारकांच्या बहादूर गप्पा गोष्टी ऐकवल्या आहेत. या सर्वांचा वैचारिक व क्रांतिकारक वारसा तिने स्वीकारल्यामुळे विद्रोहाचा सूर ती व्यक्त करते

'भक्तेदारी चालणार नाही!
ब्राह्मणशाही चालणार नाही!
आम्ही नाहीत हिंदू!
आम्ही आहोत कोयतूर (गोंड)
आमचा प्रकाश आम्हीच होवू!
परप्रकाशी कधी न राहू!-
गोंडवाना जागवा–परकीयांना भागवा' (पृ.१५९)

'जखम' या कवितेतून कवयित्रीने मायलेकीच्या संवाद प्रकट केला आहे. आदिवासींच्या दुःखाची जखम व खोली आजमावणे अशक्य आहे. हे दुःख निर्माण करणाऱ्या घटकांची गणती करणे अवघड आहे. उषाकिरण आत्राम यांच्या कवितेबद्दल आदिवासी साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक डॉ. विनायक तुमराम म्हणतात की, 'अभिनिवेशरहित आणि अंतर्मुख करणाऱ्या या कवितेने आदिवासी कवितेला एक प्रेरक बळ पुरविले आहे.'

सौ. कुसुम आलाम या आदिवासी कवीच्या दुसऱ्या पिढीतील प्रतिभावंत कवयित्री आहे. त्यांच्या 'रान आमदाचे लळे' या संग्रहातील 'वनकन्ये', 'इमान', 'वचन', 'बेडोबंद', 'महाराणी दुर्गावती' इ. कवितांमधून त्यांनी आदिम स्त्रीत्वाचा शोध घेतला आहे. 'वनकन्ये' या कवितेत रेलं नृत्यात वेभान नाचणाऱ्या आदिवासी वनकन्येस कवयित्री वर्तमान व्यथा, वेदनांची जाणीव करून देत आहे. भोसकणे, जाळणे, विरयभग, मेळघाटातील कोरकू स्त्रीचे दुःख, वर्धा येथील आदिवासी मुलाचा दुधासाठी असलेला टाहो या सर्व भीषण घटनांच्या जाणिवेसह

'तुला जाळण्यासोबतच आग फुलवायची आहे वेदनेची
त्या रसाळ वाणीतून मंगल गीत गायचे आहे. क्रांती
–विद्रोहाचे भस्म कर जळजळीत नेत्रकटाक्षाने
तरच तुझे नाचणे
खऱ्या अर्थाने आनंदपर्वाचे होईल'

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 97 : समीक्षा व्यक्ति संशोधन
UGC Approved Journal
ISSN :
2348-7143
January-2019

'आम्हाला दमन सोडल्याच देणार नाही
या देशाला बुडवाना आमचाकच कायकायचे आहे
फक्त तुझी खंबीर साथ दे
मी खचू नये म्हणून'

या विश्वाची विश्वकर्ती होण्यासाठी सखीने साथ द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करतात. स्त्री म्हणजे 'चूल' आणि 'मूल' हे मर्यादित विश्व आदिवासी कवयित्रींनी स्वरूपणे नाकारले आहे. सामाजिक बांधिलकीचा भक्कम आधार कुसुम आलाम यांच्या या कवितेतून जाणवते. 'वचन' ही कविताही संवादात्मक आहे. सखीशी स्वतः, मित्राशी संवाद आहे. कवयित्री हिंदू नाही. अप्रशिक्षित शिक्षक, जंगलावरील अतिक्रमण, जंगलातील वनसंपत्ती व खनिज संपत्तीवर भाडवलदारांचे वर्चस्व, रेलांगृत्य, नक्षलवाद्यांची दहशत या सर्वांपुढे कवयित्री अस्वस्थ आहे. अशा अवस्थेत मित्राने सहकार्य करण्याचे वचन द्यावे. उदा.

मित्रा! माझ्या शब्दांना जपण्याचं वचन दे
माझ्यावर होणाऱ्या अन्यायासाठी
मला दोन शब्द बोलायचे आहेत'

आदिवासी तरुण–तरुणींच्या एकजुटीतून अन्याय निर्मूलन होणार आहे अशा आशावाद प्रकट होतो आहे.

'वेडोवंद' याही कवितेत कवयित्रीने सखीशी संवाद साधला आहे. रेलांगृत्यात सामून–दमून या कवितेतील सखी पहाडाच्या पायथ्याशी मनसोक्तपणे अंघोळ करते आहे. अशा प्रसंगी या स्त्री देहावर नजर चुकवून कॅमेरा गेला तर या स्त्री देहाचं सौंदर्य आर्ट–गॅलरीत बंदिस्त होईल. म्हणून परपुरुष, अज्ञात, दारिद्र्य या सर्वांना नकार द्यावा, अन्यथा

'प्रत्येक आवंटशौकिनांच्या दिवाणखान्यात
नग्न होऊन [illegible] पोस्टर रूपात
आणि वर्षे म्हणतील
व्वा! काय माल आहे!'

आदिवासी स्त्री सौंदर्याचं कलाबाजारांनी 'वस्तुकरण' केलं आहे. 'नारी तू नारायणी' म्हणून आर्ट–गॅलरीत लावलेल्या चित्रांचाही बाजारही माडला आहे. 'महाराणी दुर्गावती' ही कुसुम आलामांची व्यक्तिचित्रणात्मक कविता आहे. एकीकडे मोगलांच्या सत्तेशी खंबीरपणे भुज देणाऱ्या, गोंडवनाचं स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी प्राण झोकून देणाऱ्या गढमंडलच्या महाराणी दुर्गावती शूर योद्धा होत्या. अशा शूर, मर्दानी, योद्धांच्या पराक्रमाची कवयित्रीने दखल घेतली आहे. महाराणीचा तेजस्वी वारसा आपल्यातही निर्माण व्हावा, हा कवयित्रीचा हेतू आहे. म्हणूनच

'त्या अद्भुत वीर बलिदानाची
तुझे आयुष्य झुंजार बनले
मीही घेणार जात बान्याची
तुझे समर्पित आयुष्य
घेणार आहे मी आग
तुझ्या अतूल पराक्रमाला
माझे लाख लाख प्रणाम'

महाराणी दुर्गावतीच्या समर्पित जीवनाचा तेजस्वी वारसा कवयित्रीने स्वीकारला आहे. महाराणी दुर्गावती हे कवयित्रीचे प्रेरणा स्रोत आहे, ऊर्जाकेंद्र आहे.

'रेणू भोये' या कवितेत कवयित्रीने [illegible] या पहिल्या पिढीतील आदिवासी कवयित्री आहेत. [illegible] कष्टाचे चित्रण केले आहे. गवताच्या